एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना अंतर्गत अंगणवाडी व मिनी अंगणवाडी केंद्रातील मुलांसाठी "स्टिल ताट (Compartmental Tray)" पुरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१५/प्र.क्र.७४/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५

वाचा :- १) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचे पत्र जा.क्र. एबाविसेयो/ब.व पुनर्रचना/अंगणवाडी/३४४/२०१५/का.७, दिनांक १३.०२.२०१५
२) Govt. of India Directorate General of Supplies & Disposals, New Delhi, Rate Contract No.SSTRAY/HW-२/RC-FJ०२००००/०३१५/४२/०५४४९/५२५, Dtd २५.०६.२०१४

प्रस्तावना :- सन २०१४-१५ या चालू आर्थिक वर्षापासून केंद्र शासनाने मंजूर केलेली एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना ही नवीन योजना २० जिल्हयांसाठी लागू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांसाठी उपयुक्त साहित्य खरेदी करण्यासाठी अनुदान उपलब्ध आहे. या योजनेअंतर्गत प्रति अंगणवाडी केंद्र रु.७,०००/- व प्रति मिनी अंगणवाडी केंद्र रु.५,०००/- एवढे अनुदान प्रत्येक ५ वर्षानंतर एकदा प्रति अंगणवाडी केंद्रासाठी साहित्य खरेदीसाठी उदा. दरीपंजा, भांडी, इ. करीता तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबतचे केंद्र शासनाकडून निकष ठरविण्यात आले आहेत. या तरतूदीतून ग्रामीण प्रकल्पातील ३२८०८ अंगणवाडी केंद्र व नागरी प्रकल्पातील ९९८१ अंगणवाडी केंद्रांना प्रति अंगणवाडी केंद्र २० नग तसेच ३७५५ मिनी अंगणवाडी केंद्रांना प्रति अंगणवाडी केंद्र १० नग अशा प्रकारे एकूण ८९३३३० "स्टिल ताट (Compartmental Tray)" मे. वैद्य इंडस्ट्रीज, ४६-बी, ग्रेट नाग रोड, इमामवाडा, नागपूर यांचेकडून खरेदी करुन पुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण प्रकल्पातील ३२८०८ अंगणवाडी केंद्र व नागरी प्रकल्पातील ९९८१ अंगणवाडी केंद्रांना प्रति अंगणवाडी केंद्र २० नग तसेच ३७५५ मिनी अंगणवाडी केंद्रांना प्रति अंगणवाडी केंद्र १० नग (मूळ किंमत रु.९३.०५ + १०% (५%व्हॅट+५%वाहतूक खर्च) याप्रमाणे रु.९.३० = प्रति नग रु.१०२.३५ दराप्रमाणे) अशाप्रकारे एकूण ८९३३३० स्टिल ताट (Compartmental Tray) Shape : Rectangular, Size (LXBXH) mm, min. ३००x २०० x २० व जाडी ०.७ mm ची प्रति नग किंमत रुपये १०२.३५ प्रमाणे Govt. of India Directorate General of Supplies & Disposals, New Delhi, Rate Contract No.SSTRAY/HW-२/RC-FJ०२००००/०३१५/४२/ ०५४४९/५२५, Dtd २५.०६.२०१४ रोजीच्या दरकराराच्या परिपत्रकातील विनिर्देशानुसार (Specification नुसार) Directorate General of Supplies &

Disposals, New Delhi यांचे दरकरावरील मे. वैद्य इंडस्ट्रीज, ४६-बी, ग्रेट नाग रोड, इमामवाडा, नागपूर यांचेकडून खरेदी करण्यासाठी लागणारा रु.९,१४,३२,३२५/- (रुपये नऊ कोटी चौदा लाख बत्तीस हजार तीनशे पंचवीस फक्त) एवढा निधी सन २०१४ - १५ या आर्थिक वर्षासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना दरकरारातील दर व विनिर्देश (Specification) च्या अधिन राहून उपलब्ध करुन देण्यास खालीलप्रमाणे शासन मंजूरी देत आहे. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | साहित्याचा प्रकार | प्रकल्पाचा प्रकार | एकूण अंगणवाडी केंद्र संख्या | प्रति अंगणवाडी केंद्र २० नग व मिनी अंगणवाडी केंद्र १० नग याप्रमाणे पुरवठा करावयाच्या एकूण नगांची संख्या | DGS&D चे प्रतिनग मंजूर दर + VAT + वाहतुक खर्च | एकूण अपेक्षित खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टिल ताट (Compartmental Tray) Shape : Rectangular, Size (LXBXH) mm, min. ३००x २०० x २० व जाडी ०.७ mm | ग्रामीण प्रकल्पातील अंगणवाडी केंद्र | ३२८०८ | ६५६१६० | १०२.३५ | ६,७१,५७,९७६/- |
| २ | | ग्रामीण प्रकल्पातील मिनी अंगणवाडी केंद्र | ३७५५ | ३७५५० | १०२.३५ | ३८,४३,२४२/- |
| | | एकूण (अ) | ३६५६३ | ६९३७१० | | ७,१०,०१,२१८/- |
| २ | | नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्र | ९९८१ | १९९६२० | १०२.३५ | २,०४,३१,१०७/- |
| | | एकूण (ब) | ९९८१ | १९९६२० | ------ | २,०४,३१,१०७/- |
| | | एकूण (अ) + (ब) | ४६५४४ | ८९३३३० | ----- | ९,१४,३२,३२५/- |

(अक्षरी रुपये नऊ कोटी चौदा लाख बत्तीस हजार तीनशे पंचवीस फक्त)

२. यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

१) "स्टिल ताट (Compartmental Tray)" खरेदी करतांना दरकरारपत्रकातील अटी व शर्तीचे पालन तंतोतंत करावे. तसेच दरकरारपत्रात स्पष्ट केल्याप्रमाणे (Specefication प्रमाणे) पुरवठा केला जाईल याची दक्षता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी घ्यावी.

२) सदरचा निधी शासनाच्या विहित धोरणानुसार व कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येईल.

३) पुरवठादाराने वरीलप्रमाणे वरील वस्तुंचा पुरवठा प्रकल्पस्तरा पर्यंत करावा. प्रकल्प स्तरावर साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्याच दिवशी पंचनामा करुन स्विकारावे व दुस-या दिवशी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) यांना कळवावे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत साहित्य पुरवठा करण्यासंदर्भात शासन पत्र क्र.विपताप्र-२०११/प्र.क्र.५३३/का.६,दि.१७.०७.२०१२ मधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४) वरील वस्तूंचा पुरवठा उपलब्ध तरतूदीतून विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावा. पुरवठादाराने मागणीप्रमाणे विहित प्रमाणात, विहित केलेल्या गुणवत्तेनुसार वरील वस्तूंचा प्रकल्प स्तरापर्यंत पुरवठा केला आहे. याबाबतची खात्री करण्यात यावी. तसेच सदर पुरवठा केलेल्या बाबीवर आयसीडीएसच्या वापरासाठी / शासनामार्फत पुरवठा असा शिक्का मारलेला किंवा लेबल लावलेला असावा. वरील वस्तूंचे वाटप / पुरवठा व खर्च यामध्ये अनियमितता झाल्यास व लेखा आक्षेप उद्भवल्यास त्याची जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांची राहील.

५) हया योजनेचा लाभ लाभार्थ्यांना पोहचावा, याद्दष्टीने स्वयंस्पष्ट माहिती अंगणवाडीतील नोंदवहीमध्ये उत्पादनाचा दिनांक / एकूण पुरवठा / एकूण उपयोग याबाबतची योग्य नोंद ठेवणे, इत्यादी बाबत उचित मार्गदर्शक सूचना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी द्याव्यात.

६) सदर आदेशानुसार प्रत्यक्षात पुरवठा झालेला आहे, याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात यावे. यासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई हे जबाबदार राहतील.

७) आपली अंगणवाडी हया मासिकात सदर पुरवठयाबाबत सविस्तर माहिती द्यावी.

३. यासाठी होणारा खर्च हा सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना या योजनेअंतर्गत प्रति अंगणवाडी केंद्र रु.७,०००/- व प्रति मिनी अंगणवाडी केंद्र रु.५,०००/- या बाबी अंतर्गत खालील लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवून त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

**१) ग्रामीण क्षेत्र :-**

**अ) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - लेखाशिर्ष :-** मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (११) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १५९८) २१ साधन सामुग्री व पुरवठा

**ब) राज्य शासनाचा १०% हिस्सा - लेखाशिर्ष :-** मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (१२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६०४) २१ साधन सामुग्री व पुरवठा

**२) नागरी प्रकल्पांसाठी :-**

**१) केंद्र शासनाचा ९०% हिस्सा - लेखाशिर्ष :-** मागणी क्र.एक्स-१, मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (११)

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) केंद्र हिस्सा ९०% (२२३६ १६१३) २१ साधन सामुग्री व पुरवठा

२) **राज्य शासनाचा १०% हिस्सा – लेखाशिर्ष :-** मागणी क्र.एक्स-१, २२३६-पोषण आहार, ०२ पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, ०४ केंद्र पुरस्कृत योजना, (०४) (१२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना (ग्रामीण) राज्य हिस्सा १०% (२२३६ १६२२) २१ साधन सामुग्री व पुरवठा या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागवून, त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ १११/व्यय-६, दिनांक ३०.०१.२०१५ व महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१२/प्र.क्र.४३६/का.६, दिनांक ११.०२.२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. बा. पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ , मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सहायक संचालक (वित्त व लेखा), एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
मे. वैद्य इंडस्ट्रीज, ४६-बी, ग्रेट नाग रोड, इमामवाडा, नागपूर
महिला व बाल विकास विभाग, कार्यासन क्र.४ (अर्थसंकल्प)
निवड नस्ती (कार्या.६)